# जमीन, महसूल प्रक्रियांमध्ये सुधारणा करा

## जिल्हाधिकाऱ्यांची रिअल इस्टेट संघटनांसोबत बैठक




**मुंबई** : जमीन प्रशासन सुलभ करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल उचलत, मुंबई शहराच्या जिल्हाधिकारी आंचल गोयल आणि मुंबई उपनगराचे जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी एमसीएचआय, नरेडको, बीडीए व पीईएटीए यांच्या प्रतिनिधींसह संयुक्त टास्क फोर्स आणि दोन्ही कलेक्टरेट्सच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत सामूहिक बैठक घेतली.

चर्चेची भूमिका मांडताना जिल्हाधिकारी आंचल गोयल यांनी सांगितले की उद्योगाने मांडलेले रॉयल्टीची अंमलबजावणी, प्रक्रियात्मक कालमर्यादा आणि सर्वेक्षणातील पुनरावृत्ती हे मुद्दे गंभीर असून त्यात सुधारणा आवश्यक आहेत. मानक कार्यप्रणाली-आधारित स्पष्ट प्रक्रिया राबवून सुलभीकरण, पारदर्शकता आणि कायदेशीर पालन सुनिश्चत करण्यास दोन्ही कलेक्टरेट कटिबद्ध असल्याचे त्यांनी नमूद केले.

जिल्हाधिकारी सौरभ कातियार यांनी सांगितले की शहर व उपनगर कलेक्टरेट्स एकत्र आल्याने समन्वित प्रशासन आणि एकसमान निर्णयप्रक्रिया शक्य होईल. एकात्मिक भौतिक सर्वेक्षण, समामेलन व विभाजन प्रक्रियांचे सुलभीकरण आणि जमीन अभिलेखांतील पारदर्शकता या सूचनांची वेळबद्ध अंमलबजावणी संस्थात्मक यंत्रणेद्वारे केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

एमसीएचआयचे सचिव ऋषी मेहता, मानन शाह यांनी चर्चेचे नेतृत्व केले. चर्चेत खोदकामातून निघालेल्या मातीवरील रॉयल्टी, विशेषतः ती सामग्री प्रकल्पाच्या बाहेर न नेता वापरली जात असल्यास रॉयल्टी लागू करू नये, अल्प वैधता कालावधी, खोदकाम प्रमाणातील त्रुटी आणि मंजुरीतील विलंब या मुद्द्यांचा समावेश होता. रॉयल्टी परवानगीसाठी सुलभ व वेळबद्ध मानक कार्यप्रणाली लागू करण्याचे आश्वासन दोन्ही जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. एमसीएचआयचे अध्यक्ष सुखराज नाहर, नरेडको महाराष्ट्रचे अध्यक्ष-निर्वाचित कमलेश ठाकूर, बीडीएचे अध्यक्ष विक्रम मेहता, पीईएटीएचे अध्यक्ष संदीप इसोरे आदींनी चर्चेत सहभाग घेतला.